प्रेसनोट

दिनांक ०५/०४/२०२२

आलोसे श्री. राजेंद्र बाबुराव बोन्हाडे, वय – ५३ पद – मंडळ अधिकारी, नडगाव ता. कल्याण रा. मुंबई यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी केलेबाबत कल्याण तालुका पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामिण यांना लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र | कल्याण तालुका पोलीस ठाणे, ठाणे ग्रामिण. गुन्हा रजि नं. १५४/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम ( संशोधन २०१८) सन १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १. लोकसेवक श्री. राजेंद्र बाबुराव बोन्हाडे, वय– ५३ पद – मंडळ अधिकारी, नडगाव ता. कल्याण (अटक केली आहे)<br>२. निलेश बाळाराम चौधरी, खाजगी इसम (अटक नाही) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या ओळखीच्या व्यक्तीकडे ५०,०००/– रूपयाची मागणी करून प्रत्यक्षात पडताळणीत तक्रारदार यांचेकडे १०,०००/– रूपयाची मागणी |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | – |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचे मु. गेरसे पो. खडवली, ता. कल्याण, जिल्हा–ठाणे येथे स.नं. १० हि.न. ४/अ' एकुण क्षेत्र ० हे. ४२ आर. ५ प्रती या खरेदी केलेल्या जमीनीवर अधिकार अभिलेखात ७/१२ वर नाव दाखल करणेकरीता मौजे–गेरसे तलाठी यांना १० हजार रूपये दिले होते. दिनांक २३.०३.२०२१ रोजी केलेल्या पडताळणीत लोकसेवक श्री. बोन्हाडे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच कार्यालयातील खाजगी इसम श्री. निलेश बाळाराम चौधरी यांनी लाचेच्या मागणीस प्रोत्साहनात्मक स्वरूपाचे वर्तन केले आहे. करीता लोकसेवक श्री. राजेंद्र बाबुराव बोन्हाडे, मंडळ अधिकारी, नडगाव ता. कल्याण जिल्हा–ठाणे व खाजगी इसम श्री. निलेश बाळाराम चौधरी यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८चे (सुधारीत २०१८) कलम ७, ७ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले सो. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४०० ६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– १०६४
दूरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस अॅप क्र. :– ९९३०९९७७००

(माधवी राजेकुंभार)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.